# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, यशवंत नगर, विरार (प.)

**मा. सर्वसाधारण सभा**

**मा.सर्वसाधारण सभा सूचना क्र.११**

**दि.२१/०८/२०२६**

प्रति,
मा. श्री / श्रीमती ........................................,
नगरसेवक / नगरसेविका,
वसई-विरार शहर महानगरपालिका

महोदय / महोदया,

या सूचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा सोमवार, दि.३१/०८/२०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता ‘सर्वसाधारण सभागृह’, ४ था मजला, वसई-विरार शहर महानगरपालिका, मुख्यालय, यशवंत नगर, विरार (प.) येथे खालील विषयांवर विचार विनिमय करून निर्णय घेणेसाठी आयोजित करण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेस कृपया उपस्थित रहावे, हि विनंती.

**मा.सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका**

१. मागील दि.१७/०७/२०२६ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेचे कायम केलेले इतिवृत्त माहितीस्तव.
२. प्रश्नोत्तरे.
३. शासकीय पत्र व्यवहार माहितीस्तव.
४. श्री.सुरेश ओंकार चव्हाण, सहा. फायरमन यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्ती देणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.
५. वसई-विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवरील "अधिक्षक" संवर्गातील कर्मचाऱ्यांना "सहाय्यक आयुक्त" या पदावर पदोन्नती देणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.
६. महानगरलिकेत ठोक वेतनावरील कार्यरत कर्मचारी श्री. गजानन ओगे व इतर २७ कर्मचारी यांना मा. उच्च न्यायालयातील आदेशानुसार अदा करणेत आलेल्या वेतन फरकास कार्येत्तर मान्यता मिळणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.
७. वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाअंतर्गत ६ महिने कंत्राटी पद्धतीने कार्यरत वैद्यकीय अधिकारी व पॅरामेडिकल कर्मचारी यांची मुदत दि.३१/०८/२०२६ रोजी समाप्त होत असल्याने विचार विनिमय करून निर्णय घेणे.
८. वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अधिकारी /कर्मचारी यांच्या नव्याने तयार करणेत आलेल्या आकृतीबंधाला मंजुरी मिळणेबाबत. (दि.१७/०७/२०२६ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेतील स्थगित विषय)
९. वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील विविध प्रमुख ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांची उभारणी करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.
१०. वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील एकाकी निराधार महिलांना वाढीव अनुदानाद्वारे आर्थिक सहाय्य मंजूर करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.
११. वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील वसई पूर्व येथील वॉर्ड क्र ८८, ९१ व १०५ भोयदापाडा ते राजावली ते नायगाव (पू.) वामन ढाबा पर्यंत रस्ता मजबुतीकरण करणे व आर.सी.सी. पाईप गटार बांधणेकामी तयार केलेल्या सुधारीत अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.
१२. वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ए ते आय कार्यक्षेत्रातील (NCAP अंतर्गत) विविध ठिकाणी रस्ते आणि रस्त्याच्या कडांच्या (sidepatti) सुधारणेचे काम करणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

१३. वसई-विरार शहरमहानगरपालिका कार्यक्षेत्रात दिवाणमान, नवघर, तुळींज, आचोळे, फुलपाडा आणि विराटनगर या एकूण ६ ठिकाणी इको फ्रेंडली अंत्यसंस्कार यंत्रणा बसविणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेबाबत.

१४. वसई-विरार शहर महानगरपालिका शहरास लाभलेल्या समुद्र किनाऱ्यावर SS Dustbin, GI Watch Tower, सार्वजनिक शौचालय खरेदी करणेकामी निविदा प्रक्रिया राबवून होणाऱ्या खर्चास मा. महासभेची प्रशासकिय व वित्तिय मान्यता मिळणेबाबत.

१५. स्वच्छ भारत अभियान (नागरी) घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अंतर्गत घनकचरा विलगीकरण मोहिम राबविणेसाठी निविदा काढून २४० लिटर क्षमतेच्या HDPE डस्टबीन खरेदी करणेस प्रशासकिय व वित्तिय मान्यता मिळणेबाबत.

१६. वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत स्वच्छता उपद्रव नियंत्रण व सार्वजनिक ठिकाणी तंबाखु, तंबाखुमिश्रीत पान सिगारेट, गुटखा, तंबाखुजन्य इतर पदार्थ इत्यादी खाण्यास, विक्रीस अथवा साठवणूक करणाऱ्या नागरीकांवर दंडात्मक कारवाई करणेस सन २०२६-२७, २०२७-२८, २०२८-२९ या त्रैवार्षिक वर्षाकरिता ई-निविदा मागवून क्लिन अप मार्शलची नेमणूक करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१७. घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ अंतर्गत मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणारे (Bulk Waste Generators - BWGs) यांचेकरीता ओल्या व सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या सेवा पुरवठादारांची सूची (Panel) तयार करण्यासाठी स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) प्रसिद्ध करणे कामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१८. उसगाव/शिरवली योजनेवरील कमकुवत झालेली ७०० मी.मी. व्यासाची ८ कि.मी. लांबीची अस्तित्वातील पी.एस.सी. प्रकारची जलवाहिनी बदलून त्याऐवजी एम.एस. जलवाहिनी अंथरणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

१९. सुर्या टप्पा-१ योजनेतील १५०० मी.मी. व्यासाची दिवेकरपाडा ते बहाडोली ब्रिज पर्यंत अस्तित्वातील पी.एस.सी. प्रकारची मुख्य जलवाहिनी बदलून त्याऐवजी एम.एस. जलवाहिनी अंथरणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

२०. प्रधानमंत्री टी.बी.मुक्त भारत अभियानांतर्गत पोषण आहार किट देणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

२१. वैद्यकीय आरोग्य विभागातील शासनाच्या राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतील मंजूर असलेल्या एकूण ६७५ आशा स्वयंसेविकांना माहे एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ पर्यंतचे महानगरपालिकेच्या निधीतून मानधन अदा करणेकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

२२. अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागाकरीता खरेदी करण्यात आलेल्या ६४ मीटर उंचीचे टर्न टेबल लॅडर अग्निशमन व जीव संरक्षक वाहनाचे CSMC कराराचे हस्तांतरण करणे कामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२३. राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९ वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील फेरीवाल्यांची बायोमॅट्रीक सर्वेक्षण करुन नोंदणी करणे व फेरीवाल्यांना ओळख पत्र तयार करुन देणे करीता प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

२४. वायू प्रदूषण नियंत्रण व धूळ प्रतिबंधक उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी करावयाच्या दंडात्मक कार्यवाहीला प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

२५. वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीचे वित्तीय अधिकार वाढविणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२६. प्रभाग समितीच्या प्रादेशिक क्षेत्रात करावयाच्या विकास कामांसाठी प्रभाग समितीकडे असलेले प्रशासकीय व वित्तीय अधिकार मा.स्थायी समितीकडे प्रदान करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२७. वसई-विरार शहर महानगरपालिकेतील मा. नगरसेवकांना कार्यालयीन कामकाजासाठी टॅब (Tab) खरेदी करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

आपला विशासू,

(विश्वनाथ तळेकर)
महानगरपालिका सचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका

(मा.महापौर महोदय यांच्या मान्यतेने)